**परराष्ट्र मंत्रालयाने भारतातील बांगलादेश उच्चायुक्तांना बोलावले**

17 डिसेंबर 2025

परराष्ट्र मंत्रालयाने बांगलादेशचे भारतातील उच्चायुक्त, माननीय श्री. रियाज हमिदुल्लाह यांना आज (17 डिसेंबर 2025) बोलावून बांगलादेशमधील ढासळत्या सुरक्षा परिस्थितीबद्दल भारताला असलेली गंभीर चिंता त्यांना कळवण्यात आली. त्यांचे लक्ष विशेषतः काही कट्टरपंथी घटकांच्या कृतींकडे वेधण्यात आले, ज्यांनी ढाका स्थित भारतीय मिशनच्या आसपास सुरक्षा परिस्थिती निर्माण करण्याचे प्रयोजन जाहीर केले आहे.

2. बांगलादेशातील काही अलीकडील घटनांबाबत कट्टरपंथी घटकांकडून तयार करण्याचा प्रयत्न केला जात असलेला खोटा वृत्तांत भारत पूर्णपणे फेटाळून लावतो. दुर्दैवाची बाब म्हणजे, अंतरिम सरकारने या घटनांची सखोल चौकशी केलेली नाही आणि भारताला यासंदर्भातील विश्वासार्ह पुरावेही दिलेले नाहीत.

3. भारताचे बांगलादेशच्या जनतेशी घनिष्ठ आणि मैत्रीपूर्ण संबंध आहेत, जे स्वातंत्र्य संग्रामाच्या काळात रुजले आणि विविध विकासात्मक तसेच लोक-संबंधामुळे अधिक बळकट झाले आहेत. भारताला बांगलादेशमध्ये शांतता आणि स्थैर्य असावे असे वाटते आणि मुक्त, निष्पक्ष, सर्वसमावेशक व विश्वासार्ह निवडणुका शांततापूर्ण वातावरणात होण्यासाठी भारत सतत आवाहन करत आला आहे.

4. भारताला अपेक्षा आहे की, अंतरिम सरकार आपल्या राजनयिक जबाबदाऱ्या पाळत, बांगलादेशमधील सर्व मिशन्स आणि पदांची सुरक्षितता सुनिश्चित करेल.

नवी दिल्ली

17 डिसेंबर 2025